# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जल अभियंता विभाग

**परिपत्रक**

क्र.ज.अ./ 455 /आय.सी./2025-26

दिनांक : 30.06.2025

विषय : जलआकार नियमावलीतील सुधारीत नियम क्र. 3.1(डी) व (एफ) बाबत

संदर्भ : 1. स्थायी समिती ठराव क्रमांक 1696 दिनांक 07.02.2020

2. प्रशासक (स्थायी समिती) ठराव क्रमांक 461 दिनांक 18.06.2025

जलआकार नियमावली आणि मलनि:सारण व टाकाऊ पदार्थ निष्कासन नियमावलीतील नियम क्रमांक 3.1 (डी) व (एफ) अनुक्रमे स्थायी समिती ठराव क्रमांक 1696, दिनांक 07.02.2020 व प्रशासक (स्थायी समिती) ठराव क्रमांक 461, दिनांक 18.06.2025 अन्वये सुधारित केला असून तो खालील प्रमाणे आहे.

| नियम क्र. | प्रचलित नियम | सुधारित नियम |
|---|---|---|
| 3.1 (डी) | खाजगी जलमापक 6 महिन्यांहून अधिककाळ जर नादुरुस्त असेल तर अंदाजित वापर म्हणजे पाण्याची दैनिक गरज किंवा मागील कालावधीतील प्रत्यक्ष वापराच्या आधारावर संगणना करुन काढलेला वापर यापैकी जो जास्त असेल तसेच त्या वापरावर 25% **अधिक वाढ** करण्यात येईल.<br>सदर वाढ जलमापक दुरुस्त करुन लावण्याच्या अथवा नविन जलमापक बसविण्याच्या जलदेयकाच्या कालावधीसाठी लागू नाही. | 3.1(डी)(i) - खाजगी जलमापक 6 महिन्यांहून अधिक काळ जर नादुरुस्त(*) असेल तर अंदाजित वापर म्हणजे पाण्याची दैनिक गरज किंवा मागील कालावधीतील प्रत्यक्ष वापराच्या आधारावर संगणना करुन काढलेला वापर यापैकी जो जास्त असेल तसेच त्या वापरावर 100% ***अधिक वाढ*** करण्यात येईल.<br>सदर वाढ जलमापक दुरुस्त करुन लावण्याच्या अथवा नविन जलमापक बसविण्याच्या जलदेयकाच्या कालावधीसाठी लागू नाही.<br>3.1(डी)(ii) - सद्यस्थितीतील 6 महिन्यांहून अधिक काळ वाचनास उपलब्ध नाहीत (NAT) किंवा जलमापक जमिनी खाली गाडलेल्या स्थितीत आहेत (NAP) अशा खाजगी जलमापकांबाबत अंदाजित वापर म्हणजे पाण्याची दैनिक गरज किंवा मागील कालावधीतील प्रत्यक्ष वापराच्या आधारावर संगणना करुन काढलेला वापर यापैकी जो जास्त असेल तसेच त्या वापरावर सूचनापत्र देण्यासापेक्ष 25% **अधिक वाढ** लागू करण्यात येईल. |

D:\Reshma\Reshma dtd 12.11.2024\Reshma1\DL\3.1 (f) DL\Circular.odt

Scanned with CamScanner

| नियम क्र. | प्रचलित नियम | सुधारित नियम |
|---|---|---|
| 3.1 (एफ) | जर झोपडपट्टीतील निवासी खाजगी जलमापक 12 महिन्यांहून अधिक काळ नादुरुस्त असेल तेव्हा नियम क्र.3.1(डी) प्रमाणे वापर काढण्यात येईल. | **3.1(एफ)(i) - जर** झोपडपट्टीतील निवासी खाजगी जलमापक **12 महिन्यांहून** अधिक काळ नादुरुस्त(*) असेल तेव्हा पोट नियम क्र.3.1(डी) (i) प्रमाणे वापर काढण्यात येईल.<br><br>**3.1(एफ)(ii)** - सद्यस्थितीतील **12 महिन्यांहून** अधिक काळ वाचनास उपलब्ध नाहीत (NAT) किंवा जलमापक जमिनीखाली गाडलेल्या स्थितीत आहेत (NAP) अशा झोपडपट्टीतील निवासी खाजगी जलमापकांबाबत पोटनियम क्र.3.1(डी) (ii) प्रमाणे वापर काढण्यात येईल. |

(*) नादुरुस्त - जलमापकाची स्थिती EXM, RVS, TPR, MMR

उपरोक्त सुधारित जलआकार नियमावली नियम क्रमांक 3.1(डी) (i) (ii) ची अंमलबजावणी दिनांक 01.07.2025 पासून पुढील 6 महिने नादुरुस्त जलमापकाची स्थिती सलग EXM, RVS, TPR, MMR, NAT, NAP अशी असल्यास लागू होईल. तसेच 3.1(एफ) (i) (ii) ची अंमलबजावणी दिनांक 01.07.2025 पासून पुढील 12 महिने जलमापकाची स्थिती सलग EXM, RVS, TPR, MMR, NAT, NAP अशी असल्यास लागू होईल.

सध्याचे जलआकार नियमावली आणि मलनि:सारण व टाकाऊ पदार्थ निष्कासन नियमावली (01.04.2015 पासून प्रभावी) पुस्तक नव्याने प्रकाशित करताना उपरोक्त सुधारित नियम अंतर्भुत करण्यात येईल.

आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीकरिता अग्रेषित.

26/6/2025
(मंगेश मा. शेवाळे)
उप जल अभियंता (नि. व नि.)

30/6/25
(पुरुषोत्तम ल. माळवदे)
जल अभियंता

D:\Reshma\Reshma dtd 12.11.2024\Reshma1\DL\3.1 (f) DL\Circular.odt

Scanned with CamScanner